# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

**सोमवार, दि.२३/११/२०२०**
**वेळ: १८.४५**

---

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत २८७ कारवाया- ६३,००० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. २२.११.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत २८७ कारवाया करुन ६३,००० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “जुगार विरोधी कारवाई.”

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** १)अनिल लक्ष्मण कुंभार, रा. हिप्परगा (रवा), ता. लोहारा २)आकाश देविदास सरडे, रा. तुळजापूर हे दोघे दि. २२.११.२०२० रोजी सावरकर चौक, तुळजापूर येथील एका पत्रा शेडमध्ये ऑनलाईन मटका जुगार साहित्य व रोख रक्कम १,६२०/-रु. बाळगले असतांना असतांना पो.ठा. तुळजापूर च्या पथकास आढळले. यावरुन नमूद आरोपींविरुध्द म.जु.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## “अवैध मद्य विरोधी कारवाई.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.):** कृष्णा रामचंद्र शिंदे, रा. येडशी, ता. उस्मानाबाद हा दि. २२.११.२०२० रोजी स्वत: च्या राहत्या घरासमोर २० लि. गावठी दारु (किं.अं. १,१००/-रु.) अवैधपणे बाळगला असतांना पो.ठा. उस्मानाबाद (ग्रा.) च्या पथकास आढळला.

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** बब्रुवान तुरामन कांबळे, रा. खानापूर, ता. तुळजापूर हा दि. २२.११.२०२० रोजी स्वत:च्या राहत्या घरासमोर एका रबरी नळीमध्ये ३२ लि. गावठी दारु (किं.अं. १,९२०/-रु.) अवैधपणे बाळगला असतांना पो.ठा. नळदुर्ग च्या पथकास आढळला.

**पोलीस ठाणे, वाशी:** गणेश चंदर चौरे, रा. ईट, ता. वाशी हा दि. २२.११.२०२० रोजी १८.०० वा. सु. ईट येथील जुन्या बंद शाळेच्या आवारात देशी दारुच्या १० बाटल्या (किं.अं. ५२०/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पो.ठा. वाशी च्या पथकास आढळला.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** धनु बालाजी पवार, रा. वडारवाडा, तुळजापूर हा आज दि. २३.११.२०२० रोजी स्वत:च्या राहत्या घरासमोर ४० लि. गावठी दारु (किं.अं. २,२३०/-रु.) अवैधपणे बाळगला असतांना पो.ठा. तुळजापूर च्या पथकास आढळला.

**यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपींविरुध्द संबंधीत पो.ठा. येथे म.दा.का. अंतर्गत गुन्हे नोंदवले आहेत.**

## “चोरी.”

**पोलीस ठाणे, वाशी:** सोलापूर- औरंगाबाद बस क्र. एम.एच. २० बीसी ४०५९ ही दि. २२.११.२०२० रोजी ०८.३० वा. सु. सरमकुंडी फाटा येथे नाश्त्यासाठी थांबली असता सर्व प्रवासी बसमधुन उतरले होते. यावेळी बसमध्ये कोणीही नसल्याचा फायदा घेउन अज्ञात चोरट्याने प्रवासी- मेघा प्रमोद व्याहाळकर, रा. पुष्पनगरी, औरंगाबाद यांच्या पिशवीतील ७० ग्रॅम सोन्याचे दागिने चोरुन नेले. अशा मजकुराच्या मेघा व्याहाळकर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, परंडा:** अतुल शिवसिंह ठाकुर, रा. राजापुर गल्ली, परंडा हे दि. २२.११.२०२० रोजी २०.३९ वा. सु. शिवाजी चौक, परंडा येथील आपले किराणा दुकान उघडे ठेउन लघुशंकेसाठी रस्त्यापलीकडे गेले होते. तेथून परतल्यावर दुकानाच्या गल्ल्यातील ४,३०० ₹ रोख रक्कम चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अशा मजकुराच्या अतुल ठाकुर यांनी आज दि. २३.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “लैंगीक अत्याचार.”

**पोलीस ठाणे, मरुम:** मुरुम पो.ठा. हद्दीतील एका खेडेगावातील एका युवक (नाव- गाव गोपनीय) गावातीलच १२ वर्षीय मुलास दुध आणण्यासाठी मोटारसायकलवर सोबत घेउन गेला होता. दरम्यान त्या मुलाला गावाबाहेरील एका शेतात त्या मुलासोबत त्या युवकाने अनैसर्गीक लैंगीक अत्याचार केले. अशा मजकुराच्या पिडीत मुलाच्या आईने काल दि. २२.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७७ आणि पोक्सो कासदा कलम- ४, ८, १२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “अल्पवयीन मुलीचे अपहरण.”

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (श.):** उस्मानाबाद (श.) पो.ठा. हद्दीतील एका १५ वर्षीय मुलीचे गल्लीतीलच एका युवकाने (नाव- गाव गोपनीय) दि. २२.११.२०२० रोजी १०.३० वा. सु. राहत्या गल्लीतून अज्ञात कारणासाठी अपहरण केले. अशा मजकुराच्या अपहृत मुलीच्या आईच्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३६३ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “अपघात.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** चालक- शिवाजी पुंडलीक चव्हाण, रा. सलगरा (मड्डी), ता. तुळजापूर यांनी दि. २१.११.२०२० रोजी १५.०० वा. सु. जकेकुर चौरस्ता येथील रस्त्यावर स्विफ्ट कार क्र. एम.एच. १२ एसई ३०२२ ही निष्काळजीपणे, हयगईने चलवून दत्तात्रय शिवाजी गायकवाड, रा. जकेकुर, ता. उमरगा यांच्या मो.सा. क्र. एम.एच. २५ एपी ७३८५ ला समोरुन धडक दिली. या अपघातात दत्तात्रय गायकवाड हे गंभीर जखमी झाले. अशा मजकुराच्या व्यंकट तुळशीराम गायकवाड, रा. जकेकुर यांनी काल दि. २२.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (श.):** चालक- अल्लाबक्श हानिफ शेख, रा. ढोकी, ता. उस्मानाबाद यांनी दि. १३.११.२०२० रोजी ०१.०० वा. सु. उस्मानाबाद येथील शिवशाही ढाब्यासमोरील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५२ वर

मो.सा. क्र. एम.एच. २५ एई ३४३० ही निष्काळजीपणे, हयगईने चालवून पायी चालत जाणारे विश्वसुंदर गुरुनाथ निकम, वय २५ वर्षे, रा. कुरणेनगर, बार्शीनाका, उस्मानाबाद यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात विश्वसुंदर निकम हे गंभीर जखमी होउन उपचारादरम्यान मयत झाले. अपघातानंतर नमूद मो.सा. चालक घटनास्थळावरुन मो.सा. सह पसार झाला. अशा मजकुराच्या गुरुनाथ विश्वनाथ निकम (मयताचे पिता) यांनी अकस्मात मृत्यु क्र. ९६ / २०२० च्या चौकशीत दिलेल्या लेखी जबाबावरुन भा.दं.सं. कलम- ३०४ (अ), २७९, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, बेंबळी:** चालक- विनोद वामन डोलारे, रा. केशेगांव, ता. उस्मानाबाद यांनी दि. २२.११.२०२० रोजी १९.३० वा. सु. केशेगांव येथीर रस्त्यावर मो.सा. क्र. एम.एच. २५- ७२८० ही निष्काळजीपणे, हयगईने चालवून गावकरी- हरीभाऊ भाऊराव डोलारे हे चालवत असलेल्या मोटारसायकलला पाठीमागुन धडक दिल्याने हरीभाऊ डोलारे हे गंभीर जखमी झाले आहेत. अशा मजकुराच्या हरीभाऊ डोलारे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७ आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “मारहाण.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** औराद, ता. उमरगा येथील मोहन तुकाराम कांबळे यांचे कुटुंबीय व उध्दव माधव वाघमारे यांच्या कुटूंबीयांत दि. २० व २१.११.२०२० रोजी पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरुन वाद होउन दोन्ही गटांनी परस्पर गटातील स्त्री- पुरुषांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, पट्ट्याने मारहाण करुन जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या दोन्ही गटांनी दि. २२.११.२०२० रोजी दिलेल्या स्वतंत्र २ प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हे नोंदवले आहेत.

**पोलीस ठाणे, परंडा:** जयदेव आबा गोफणे, रा. कौडगाव, ता. परंडा यांच्या शेतातील दगड शेजारच्या- हजारे कुटूंबीयांनी स्वत:च्या शेतात टाकण्यास नेले होते. याचा जाब जयदेव गोफणे यांनी विचारला असता दि. २१.११.२०२० रोजी १७.३० वा. सु. हजारे कुटूंबातील बळीराम, विजय, अजय, कावेरा, वैजिनाथ, गणेश, भैरवनाथ, राहुल यांनी जयदेव यांसह पुतण्या- विकास व बाजीराव यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले तसेच ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या जयदेव गोफणे यांनी काल दि. २२.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४७, १४८, १४९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**